Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P082
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

# भारतीय संस्कृतीत भारतीय ज्ञानपरंपरेचे महत्व

**प्रा. शुभांगी जुवार**
(समाजशास्त्र विभाग)
श्री लेमदेव पाटील महाविद्यालय, मांढळ

**गोषवारा**

भारतीय संस्कृती ही जगातील प्राचीन व समृद्ध संस्कृतींपैकी एक असून तिचा पाया भारतीय ज्ञानपरंपरेवर आधारित आहे. वेद, उपनिषदे, दर्शनशास्त्रे, स्मृतीग्रंथ, आयुर्वेद, योग, गणित, खगोलशास्त्र, कला व साहित्य यांच्या माध्यमातून विकसित झालेली भारतीय ज्ञानपरंपरा मानवी जीवनाच्या सर्व अंगाचा सर्वांगीण विचार करते. ही ज्ञानपरंपरा केवळ बौद्धिक ज्ञानापुरती मर्यादित न राहता नैतिकता, मूल्यव्यवस्था, आचार-विचार व जीवनशैली यांना दिशा देणारी आहे. भारतीय संस्कृतीत धर्म, अर्थ, काम व मोक्ष या पुरुषार्थांच्या संकल्पनेद्वारे मानवी जीवनाचा संतुलित विकास साधण्याचा प्रयत्न दिसून येतो. गुरु–शिष्य परंपरा, अनुभवाधारित शिक्षण,निसर्गाशी सुसंवाद व 'वसुधैव कुटुंबकम्' यांसारख्या तत्त्वांमुळे भारतीय ज्ञानपरंपरेचे वैशिष्ट्य अधोरेखित होते. आधुनिक काळात विज्ञान, तंत्रज्ञान व भौतिक प्रगतीसोबत नैतिक अधःपतन, पर्यावरणीय संकटे व मानसिक ताणतणाव वाढत असताना भारतीय ज्ञानपरंपरा शाश्वत विकास, मूल्यशिक्षण, मानसिक आरोग्य व मानवी कल्याणासाठी मार्गदर्शक ठरते. त्यामुळे भारतीय संस्कृतीच्या संदर्भात भारतीय ज्ञानपरंपरेचे महत्त्व केवळ ऐतिहासिक नसून वर्तमान व भविष्यकालीन सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकासासाठीही अत्यंत मोलाचे आहे.

महत्त्वाचे शब्द (Key word): भारतीय संस्कृती, भारतीय ज्ञानपरंपरा, गुरु–शिष्य परंपरा, वेद व उपनिषदे, दर्शनशास्त्र, गुरु–शिष्य परंपरा, मूल्यशिक्षण, नैतिकता, योग व आयुर्वेद,

प्रस्तावना

भारतीय संस्कृती ही जगातील सर्वांत प्राचीन आणि सखोल संस्कृतींपैकी एक आहे. हजारो वर्षांपासून भारतीय उपखंडाने धार्मिक, तात्त्विक, वैज्ञानिक, सामाजिक आणि कलात्मक दृष्टिकोनातून मानवजातीला अमूल्य योगदान दिले आहे. संस्कृती ही केवळ परंपरा किंवा सण-उत्सवपुरती मर्यादित नाही, तर ती जीवन जगण्याची एक संपूर्ण पद्धत, मूल्ये आणि ज्ञानसंपन्नतेचा मार्ग दर्शवते.

भारतीय ज्ञान प्रणाली ही अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. ही प्रणाली वेद, उपनिषद, पुराणे, महाभारत, रामायण, आयुर्वेद, योग, ज्योतिष, वास्तुशास्त्र, आणि गणित-तार्किक विचारसरणी यांसारख्या विविध अंगांनी समृद्ध आहे. या ज्ञान प्रणालीने मानवी जीवनातील नैतिकता, अध्यात्मिकता, सामाजिक आचार, आरोग्य, शिक्षण, पर्यावरणीय संतुलन, आणि तांत्रिक प्रगती या सर्व बाबींना संतुलित दृष्टिकोन दिला आहे.भारतीय ज्ञान प्रणालीचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील समग्र दृष्टिकोन  यात फक्त भौतिक प्रगतीवर भर नाही तर मानसिक, आध्यात्मिक, नैतिक आणि सामाजिक प्रगतीवर सुद्धा भर दिलेला आहे. उदा. आयुर्वेद हे आरोग्य तर, योगशास्त्र हे शरीर, मन आणि आत्म्याचे संतुलन साधण्याचे तंत्रज्ञान आहे. गणित, खगोलशास्त्र, वास्तुशास्त्र या क्षेत्रांत भारतीय ज्ञान प्रणालीने जागतिक स्तरावर अद्वितीय योगदान दिले आहे. संस्कृती ही एखाद्या समाजाची जीवनशैली, परंपरा, सवयी, कला, भाषा आणि विचारसरणी यांचा एकत्रित समूह आहे. संस्कृती समाजातील लोकांना एकत्र बांधते आणि त्यांचे जीवन मूल्यपूर्ण बनवते. प्रत्येक समाजाची संस्कृती वेगळी असते, कारण त्यात त्या समाजाचे इतिहास, भौगोलिक परिस्थिती, आणि सामाजिक व्यवहार प्रतिबिंबित होतात. संस्कृती आपल्याला आपले खरे मूल्य आणि परंपरा ओळखायला शिकवते आणि समाजाची एकरूपता टिकवून ठेवते.

भारतीय ज्ञानप्रणालीची व्याख्या:-

भारतीय ज्ञानप्रणाली म्हणजे भारतीय संस्कृतीतून विकसित झालेली अशी ज्ञानपरंपरा जी वेद, उपनिषदे, दर्शनशास्त्रे, आयुर्वेद, योग, गणित, खगोलशास्त्र, वास्तु, कला व नीतिशास्त्र यांसारख्या विविध शाखांचा समावेश करते.

संस्कृतीच्या पुनरूजीवनाकरिता प्रागैतिहासिक काळातील योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. अश्मयुगीन मानव अगोदर शिकार करीत असे.  त्या पुढचे पाऊल टाकत त्याला अन्न संकलन करण्याची गरज भासली आणि त्यातूनच अग्नीचा शोध लागला. यामध्ये आदिवासी हा घटक महत्त्वाचा असून रात्रंदिवस जंगलात वास्तव्य करीत असल्यामुळे त्याला झाड, वनस्पती पासून औषध शास्त्राचे ज्ञान अवगत झाले. तेच औषधशास्त्रज्ञाचे ज्ञान प्राचीन काळापासून तर आज आत्तापर्यंत आयुर्वेदात आपल्याला आरोग्याचे उपचार करीत आहे. अर्थात प्रागैतिहासिक काळातील  ज्ञानामुळे मानवाने निसर्गाशी समन्वय साधला नि जीवनपयोगाचे तंत्र साध्य केले. तर वैदिक काळात ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद, अथर्ववेद या वेदाच्या ज्ञानामुळे  आपल्या भारतीय संस्कृतीत यज्ञ, मंत्र, सूर्य आणि पर्जन्याचे काटेकोर निरीक्षण होऊन समाजशिस्त, नैतिक मूल्ये आणि अध्यात्मिक जीवनाचे मार्गदर्शन लाभले. उत्तर वैदिक काळ म्हणजे उपनिषदांचा काळ याच काळात ब्रह्मा, आत्मा, कर्म, मोक्ष यांचे तात्विक विचार आपण आत्मसात केले. प्रत्येक व्यक्ती ही  ब्रह्मचर्याचाच एक भाग आहे. कर्मयोगाचा अभ्यास करूनच आपल्या अंगी परिपक्वता येत असते. म्हणजेच तात्विक, अध्यात्मिक विकास, नैतिक जीवनशैलीची जाणीव  जर झाली असेल तर ती उत्तर वैदिक काळात. भारतीय  संस्कृतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सर्वांना आदर्श असलेली हडप्पा व मोहोनजोदाडो ही संस्कृती. ही संस्कृती म्हणजे भारतीय संस्कृतीचा बहुमूल्य ठेवा आहे. नियोजित रस्ते, नाल्याची व्यवस्था, सार्वजनिक स्नानगृह नाल्यांची व्यवस्था, सर्वात मोठे स्नानगृह, स्वच्छता, स्थापत्य, आर्थिक नियोजन आणि अत्यंत भरभराटीत असलेली सांस्कृतिक प्रगती होय. संस्कृतीचे अध्ययन केल्याशिवाय मानवी समाजाचे अध्ययन पूर्ण होऊ शकत नाही. कारण

संस्कृती मानव समाजाचे एक अविभाज्य अंग आहे. जगातील संपूर्ण मानव समाजाची संस्कृती एकसारखी आढळत नाही कारण समाज आणि प्रदेश परत्वे लोकांचे ज्ञान ,विश्वास, मूल्य व प्रमाणके ,प्रथा,चिन्हे यात विभिन्नता आढळते.

भारतीय ज्ञानपरंपराचे महत्व:-

भारतीय ज्ञानपरंपरा ही भारताची अत्यंत प्राचीन व समृद्ध परंपरा आहे. या परंपरेत धर्म, तत्त्वज्ञान, विज्ञान, गणित, आयुर्वेद, योग, खगोलशास्त्र, साहित्य आणि कला यांचा समावेश होतो. प्राचीन काळी ज्ञान केवळ पुस्तके किंवा लिखित स्वरूपात नव्हते, तर ते जीवनाशी जोडलेले होते आणि समाजाच्या कल्याणासाठी वापरले जात होते. भारतातील ज्ञानाचा प्रसार प्रामुख्याने मौखिक परंपरेद्वारे झाला. गुरु-शिष्य परंपरेतून वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत यांसारखे ग्रंथ पाठांतराच्या माध्यमातून पिढ्यान्-पिढ्या जतन करण्यात आले. कथा, लोककथा, ओव्या, म्हणी आणि लोकगीते यांमधूनही ज्ञान, नीतीमूल्ये व संस्कार समाजात रुजवले गेले.

भारतीय साहित्य हे विविध भाषांमधून विकसित झालेले असून ते विचार, भावना व जीवनदर्शन व्यक्त करतात. संस्कृत, प्राकृत, पाली तसेच मराठी, हिंदी, तमिळ यांसारख्या भाषांतील साहित्याने भारतीय संस्कृती समृद्ध केली आहे. भक्ती साहित्य, महाकाव्ये, नाटके आणि लोकसाहित्य यांमधून समाजजीवनाचे प्रतिबिंब दिसून येते.भारतीय कला ही सौंदर्य, अध्यात्म आणि परंपरा यांचे सुंदर मिश्रण आहे. चित्रकला, शिल्पकला आणि वास्तुकला यांमधून भारतीय कलाकारांनी आपली सर्जनशीलता व्यक्त केली आहे. तसेच संगीत, नृत्य, नाट्य व लोककला यांमुळे भारतीय संस्कृती अधिक जिवंत व समृद्ध बनली आहे. अशा प्रकारे भारतीय ज्ञानपरंपरा, साहित्य आणि कला आजही आपल्या जीवनाला दिशा देतात. भारतीय ज्ञानप्रणाली व संस्कृतीची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे गुरु-शिष्य परंपरा, गुरुकुल शिक्षणपद्धती व मौखिक परंपरेतून ज्ञानसंवर्धन. वेद, उपनिषदे, दर्शनशास्त्रे, आयुर्वेद, योग, गणित, खगोलशास्त्र यांसारख्या विविध ज्ञानशाखांचा यात समावेश आहे. भौतिक व आध्यात्मिक ज्ञानाचा समन्वय, नैतिकता व चारित्र्यनिर्मितीवर दिलेला भर, तसेच सहिष्णुता व सर्वसमावेशकता ही या ज्ञानप्रणालीची वैशिष्ट्यपूर्ण अंगे मानली जातात. भारतीय ज्ञानप्रणाली व संस्कृतीने व्यक्तीचा सर्वांगीण विकास साधण्यास मोठे योगदान दिले आहे. या परंपरेमुळे समाजात सत्य, अहिंसा, करुणा, सहअस्तित्व व "वसुधैव कुटुंबकम्" यांसारखी उच्च जीवनमूल्ये रुजली. योग, आयुर्वेद व तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून या ज्ञानप्रणालीने जागतिक स्तरावर मानवकल्याणाचा संदेश दिला. म्हणूनच भारतीय ज्ञानप्रणाली व संस्कृती ही केवळ भूतकाळातील वारसा नसून आजच्या व भविष्यातील समाजासाठी मार्गदर्शक ठरणारी अमूल्य ठेवा आहे. भारतीय ज्ञानपरंपरा ही भारताची अत्यंत प्राचीन व समृद्ध परंपरा आहे. या परंपरेत धर्म, तत्त्वज्ञान, विज्ञान, गणित, आयुर्वेद, योग, खगोलशास्त्र, साहित्य आणि कला यांचा समावेश होतो. प्राचीन काळी ज्ञान केवळ पुस्तके किंवा लिखित स्वरूपात नव्हते, तर ते जीवनाशी जोडलेले होते आणि समाजाच्या कल्याणासाठी वापरले जात होते.

भारतातील ज्ञानाचा प्रसार प्रामुख्याने मौखिक परंपरेद्वारे झाला. गुरु-शिष्य परंपरेतून वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत यांसारखे ग्रंथ पाठांतराच्या माध्यमातून पिढ्यान्-पिढ्या जतन करण्यात आले. कथा, लोककथा, ओव्या, म्हणी आणि लोकगीते यांमधूनही ज्ञान, नीतीमूल्ये व संस्कार समाजात रुजवले गेले.

भारतीय साहित्य हे विविध भाषांमधून विकसित झालेले असून ते विचार, भावना व जीवनदर्शन व्यक्त करते. संस्कृत, प्राकृत, पाली तसेच मराठी, हिंदी, तमिळ यांसारख्या भाषांतील साहित्याने भारतीय संस्कृती समृद्ध केली आहे. भक्ती साहित्य, महाकाव्ये, नाटके आणि लोकसाहित्य यांमधून समाजजीवनाचे प्रतिबिंब दिसून येते.

भारतीय कला ही सौंदर्य, अध्यात्म आणि परंपरा यांचे सुंदर मिश्रण आहे. चित्रकला, शिल्पकला आणि वास्तुकला यांमधून भारतीय कलाकारांनी आपली सर्जनशीलता व्यक्त केली आहे. तसेच संगीत, नृत्य, नाट्य व लोककला यांमुळे भारतीय संस्कृती अधिक जिवंत व समृद्ध बनली आहे. अशा प्रकारे भारतीय ज्ञानपरंपरा, साहित्य आणि कला आजही आपल्या जीवनाला दिशा देतात.

भारताने जगाला शून्याची देणगी दिली, आयुर्वेदासारखी निसर्गकिंद्रित आरोग्य प्रणाली दिली , प्राचीन धातुशास्त्राचा चमत्कार म्हणून प्रसिद्ध असलेला दिल्लीचा 'लोहस्तंभ ' स्थापत्यशास्त्राचा अद्भुत चमत्कार म्हणून ज्यांच्याकडे पाहावे लागेल असे तंजावर येथील पूर्व बृहदिश्वराचे मंदिर अजिंठा आणि वेरूळ येथील जगप्रसिद्ध लेणी आणि अपौरुषेय असे चार वेद, अठरा पुराणे ,उपनिषदे, रामायण महाभारतादी महाकाव्ये ,चौदा विद्या चौसष्ट कला, चीन ,जापान, श्रीलंका आणि दक्षिण पूर्व आशिया खंडातील कितीतरी देशात पोहोचलेला बौद्ध धर्म, 'अस्तेय, 'ब्रह्मचर्य ' आणि 'अपरिग्रहाची शिकवण देणारा 'जैन धर्म' जडी-बुटी आणि पारंपारिक ज्ञानाद्वारे अशक्यप्राय व्याधीवर यशस्वी उपचार करणारे मुस्लिम हकीम - वैद्य , योग - साधना, संगीत - नाटक आणि भारतीय कला परंपरा यांच्याशी एकरूप होण्याची एक चांगली संधी या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या भावी पिढ्यांना लाभते आहे. जगातील सर्वच देशांमध्ये त्यांच्या ज्ञानपरंपरा आहेत. या परंपरावर हजारो वर्षे पुरातन असलेल्या धर्मसत्तेचा प्रभाव असणे साहजिक आहे. त्यामुळेच अमेरिकन आणि युरोपियन ज्ञान परंपरेत ख्रिश्चन धर्माचा, अरेबिक ज्ञान परंपरेवर इस्लाम त्याच प्रमाणे भारतीय ज्ञानपरंपरेत हिंदू-बौद्ध-जैन-शिख या भारतात उगम पावलेल्या विचारधारांचा आणि धर्म संस्थांचा प्रभाव दिसून येतो.चीनच्या जगप्रसिद्ध भिंतीवर आजही काही संस्कृत श्लोक आढळतात. हंगेरीतील बुडापेस्ट शहराजवळ विशेष करून वसविलेले वेदिक विलेज, इंडोनेशिया, थायलंड ,म्यानमार, कंबोडिया अशा आपल्या शेजारी देशाच्या इतिहासावर कित्येक शतके टिकून असणारा रामायण, महाभारत' या महाकाव्य, तत्त्वज्ञान ,परंपरा आणि कथांचा प्रभाव, तिथे आजही दसऱ्यात सादर केली जाणारी ' रामलीला ' नाट्यप्रयोग आपल्याला अचंबित करतात. इतकेच नव्हे तर कितीतरी दक्षिण आशियाई देशांच्या भाषांचे ' संस्कृत हेच उगमस्थान आहे. भारतीय ज्ञान परंपरा ही केवळ मानव जातीचाच विचार करीत नाही तर ती चराचर सृष्टीचा, इतर प्राणीमात्र ,सजीव-निर्जीवांचाही

विचार करणारी आहे. सगुण साकार आणि निर्गुण निराकार, व्यक्त आणि अव्यक्त ब्रह्माचा विचार करणारी ही ज्ञान परंपरा आहे . कोणत्याही परकीय संस्कृतीला हीन न लेखता , कोणत्याही संस्कृतीवर ,प्रदेशावर आक्रमण न करता ,कुणाच्याही श्रद्धेवर घाला न घालता आस्तिक आणि नास्तिकांचाही विचार व आदर करणारी संस्कृती म्हणून भारतीय ज्ञान परंपरेकडे पाहणे गरजेचे आहे. ज्ञान - विज्ञान, आरोग्यशास्त्र ,ललितकला, शिल्पकला, व्यवस्थापन शास्त्र , स्थापत्यशास्त्र ,न्याय शास्त्र, राज्यशास्त्र ,धर्मशास्त्र खगोलशास्त्र, गणित, तत्त्वज्ञान ,अध्यात्म, अर्थशास्त्र, साहित्य अशा कितीतरी क्षेत्रात भारताने संपूर्ण मानव जातीसाठी ज्ञानाची निर्मिती केली आहे. ज्ञानाच्या स्वामित्वाच्या पलीकडे विचार करीत विश्व कल्याणासाठी ज्ञानाची निर्मिती केली आहे हे विसरता येणार नाही. भारताने जगाला शून्याची देणगी दिली, आयुर्वेदासारखी निसर्गकेंद्रित आरोग्य प्रणाली दिली , प्राचीन धातुशास्त्राचा चमत्कार म्हणून प्रसिद्ध असलेला दिल्लीचा 'लोहस्तंभ ' स्थापत्यशास्त्राचा अद्भुत चमत्कार म्हणून ज्यांच्याकडे पाहावे लागेल असे तंजावर येथील पूर्व बृहदिश्वराचे मंदिर ,अजिंठा आणि वेरूळ येथील जगप्रसिद्ध लेणी आणि अपौरुषेय असे चार वेद, अठरा पुराणे,उपनिषदे,रामायण महाभारतादी महाकाव्ये ,चौदा विद्या चौसष्ट कला, चीन ,जापान, श्रीलंका आणि दक्षिण पूर्व आशिया खंडातील कितीतरी देशात पोहोचलेला बौद्ध धर्म, अस्तेय ब्रह्मचर्य ' आणि अपरिग्रहाची शिकवण देणारा जैन धर्म जडी-बुटी आणि पारंपारिक ज्ञानाद्वारे अशक्यप्राय व्याधीवर यशस्वी उपचार करणारे मुस्लिम हकीम-वैद्य, योग-साधना, संगीत - नाटक आणि भारतीय कला, परंपरा यांच्याशी एकरूप होण्याची एक चांगली संधी या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या भावी पिढ्यांना लाभते आहे. जगातील सर्वच देशांमध्ये त्यांच्या ज्ञानपरंपरा आहेत. या परंपरावर हजारो वर्षे पुरातन असलेल्या धर्मसत्तेचा प्रभाव असणे साहजिक आहे. त्यामुळेच अमेरिकन आणि युरोपियन ज्ञान. परंपरेत ख्रिश्चन धर्माचा, अरेबिक ज्ञान परंपरेवर इस्लाम त्याच प्रमाणे भारतीय ज्ञानपरंपरेत हिंदू-बौद्ध - जैन - शिख या भारतात उगम पावलेल्या विचारधारांचा आणि धर्म संस्थांचा प्रभाव दिसून येतो.चीनच्या जगप्रसिद्ध भिंतीवर आजही काही संस्कृत श्लोक आढळतात. हंगेरीतील बुडापेस्ट शहराजवळ विशेष करून वसविलेले वेदिक विलेज, इंडोनेशिया, थायलंड, म्यानमार, कंबोडिया अशा आपल्या शेजारी देशाच्या इतिहासावर कित्येक शतके टिकून असणारा रामायण, महाभारत या महाकाव्य, तत्त्वज्ञान ,परंपरा आणि कथांचा प्रभाव तिथे आजही दसऱ्यात सादर केली जाणारी ' रामलीला ' नाट्यप्रयोग आपल्याला अचंबित करतात. इतकेच नव्हे तर कितीतरी दक्षिण आशियाई देशांच्या भाषांचे संस्कृत हेच उगमस्थान आहे. भारतीय ज्ञान परंपरा ही केवळ मानव जातीचाच विचार करीत नाही ; तर ती चराचर सृष्टीचा, इतर प्राणीमात्र सजीव-निर्जीवांचाही विचार करणारी आहे. सगुण साकार आणि निर्गुण निराकार, व्यक्त आणि अव्यक्त ब्रह्माचा विचार करणारी ही ज्ञान परंपरा आहे कोणत्याही परकीय संस्कृतीला हीन न लेखता , कोणत्याही संस्कृतीवर ,प्रदेशावर आक्रमण न करता ,कुणाच्याही श्रद्धेवर घाला न घालता आस्तिक आणि नास्तिकांचाही विचार व आदर करणारी संस्कृती म्हणून भारतीय ज्ञान परंपरेकडे पाहणे गरजेचे आहे. ज्ञान-विज्ञान, आरोग्यशास्त्र ,ललितकला, शिल्पकला, व्यवस्थापन शास्त्र, स्थापत्यशास्त्र ,न्याय शास्त्र, राज्यशास्त्र ,धर्मशास्त्र खगोलशास्त्र , गणित, तत्त्वज्ञान ,अध्यात्म, अर्थशास्त्र, साहित्य अशा कितीतरी क्षेत्रात भारताने संपूर्ण मानव जातीसाठी ज्ञानाची निर्मिती केली आहे. ज्ञानाच्या स्वामित्वाच्या पलीकडे विचार करीत विश्व कल्याणासाठी ज्ञानाची निर्मिती केली आहे हे विसरता येणार नाही.

भारतीय संस्कृतीचा पाया चार वेद व पुरुषार्थांच्या संकल्पनेवर आधारित आहे. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद हे चार वेद भारतीय ज्ञानपरंपरेचे आद्य स्रोत मानले जातात. ऋग्वेदात देवतांची स्तुती करणाऱ्या सूक्तांचा समावेश असून त्यातून निसर्गपूजा व आध्यात्मिक विचार प्रकट होतो. यजुर्वेदात यज्ञकर्म व धार्मिक विधींचे सविस्तर मार्गदर्शन आहे. सामवेद हा संगीतमय असून त्यातून भक्ती, गायन व नादशक्तीचे महत्त्व अधोरेखित होते, तर अथर्ववेदात सामाजिक जीवन, आरोग्य, रोगनिवारण व गृहस्थाश्रमाशी संबंधित विचार मांडलेले आहेत. या चार वेदांमधून धार्मिक, सामाजिक व नैतिक जीवनाचे मार्गदर्शन मिळते तर भारतीय संस्कृतीत धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ जीवनमार्ग दर्शक मानले जातात. धर्म म्हणजे नीती, कर्तव्य व योग्य आचार, अर्थ म्हणजे जीवननिर्वाहासाठी आवश्यक संपत्ती व साधने, काम म्हणजे जीवनातील आनंद व सौंदर्याचा योग्य उपभोग; तर मोक्ष म्हणजे आत्मज्ञान व जन्म-मृत्यूच्या बंधनातून मुक्ती होय. चार वेद व पुरुषार्थ यांच्या संयोगातून भारतीय संस्कृतीचा सर्वांगीण विकास झाला आहे.वेदांनी आध्यात्मिक व नैतिक मूल्यांची पायाभरणी केली, तर पुरुषार्थांनी व्यक्तीच्या जीवनाला उद्दिष्ट व दिशा दिली. त्यामुळे भारतीय संस्कृती ही केवळ धार्मिक नसून ती जीवनाच्या सर्व क्षेत्रांना समावून घेणारी, समतोल व मानवकेंद्रित संस्कृती म्हणून ओळखली जाते. योग हा शरीर, मन आणि आत्मा यांच्यातील संतुलन साधण्याचा मार्ग आहे. योगासने, प्राणायाम, ध्यान आणि समाधी या साधनांद्वारे मनःशांती, तणावमुक्ती, मानसिक एकाग्रता आणि शारीरिक तंदुरुस्ती मिळते. योगाचे महत्व फक्त शारीरिक स्वास्थ्यापुरते मर्यादित नाही; मानसिक स्वास्थ्य, सकारात्मक दृष्टिकोन, नैतिक विचार आणि आध्यात्मिक उन्नती साधणे हे याचे प्रमुख उद्दिष्ट आहे. भारतीय तत्त्वज्ञानात योगाला जीवनाचे मार्गदर्शन मानले गेले आहे, ज्यामुळे व्यक्तीला आत्मसाक्षात्कार व जीवनातील उद्दिष्टे साध्य करणे शक्य होते.

भारतीय ज्ञानपरंपरेत आयुर्वेद व योगाचे महत्त्व व्यापक आहे. या परंपरेने व्यक्तीच्या सर्वांगीण विकासावर भर दिलेला आहे. शारीरिक स्वास्थ्य, मानसिक संतुलन, सामाजिक आचारसंहिता आणि आध्यात्मिक उन्नती , योग व आयुर्वेदाच्या माध्यमातून जीवनातील नैतिक मूल्ये, सातत्य, संयम आणि संतुलन यांची जाणीव होते. आधुनिक काळात जागतिक आरोग्य, मानसिक तंदुरुस्ती, योगाभ्यास केंद्रे आणि आयुर्वेदिक औषधनिर्मिती यामुळे या ज्ञानाचे जागतिक महत्त्व अधोरेखित झाले आहे. आयुर्वेद व योग केवळ उपचार किंवा व्यायाम पद्धती नसून, जीवनशैली, नैतिकता, मानसिक स्वास्थ्य आणि आध्यात्मिक उन्नतीसाठी भारतीय ज्ञानपरंपरेचे सर्वांगीण शिक्षण होय. भारतीय ज्ञानप्रणाली व संस्कृतीत वैमानिकशास्त्र आणि ऋषींचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. प्राचीन भारतीय ग्रंथांमध्ये यंत्र,उड्डाण, यंत्रशास्त्र आणि अंतरिक्षाची माहिती मिळते.

वैमानिकशास्त्राचा उल्लेख मुख्यतः विमान, वायुदूत यंत्र आणि सुर्ययान यांसारख्या तांत्रिक कल्पनांमध्ये आढळतो. ऋषी व विद्वान हेच विज्ञान, तंत्रज्ञान आणि यंत्रसामग्रीच्या विकासाचे सूत्रधार होते. भगवद् पुराण, रामायण, महाभारत आणि वैमानिक ग्रंथांमध्ये उड्डाणशास्त्र, यांत्रिकी, ध्वनीशास्त्र आणि प्राकृत ऊर्जा यांच्या तत्त्वांचे वर्णन आहे, ज्यातून भारतीय विज्ञान परंपरेचा सखोल अभ्यास होतो. भारतीय ऋषींनी यांत्रिकी, गणित, खगोलशास्त्र व भौतिकशास्त्र यांचा योग साधून वैमानिक कल्पना तयार केल्या आणि त्यातून प्रयोगात्मक आणि सैद्धांतिक ज्ञान एकत्र करून तंत्रज्ञानाच्या नव्या संकल्पनांचा विकास केला. यामुळे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे मूल्य जीवनात तसेच आध्यात्मिक व तात्त्विक चिंतनात एकत्रीत राहिले. या परंपरेने भारतीय ज्ञानप्रणालीला वैश्विक ओळख दिली आणि आजच्या आधुनिक वैमानिक व अंतरिक्ष संशोधनाला प्रेरणा मिळाली.
भारतीय ज्ञानपरंपरेत ऋषींच्या वैमानिकशास्त्रातील योगदानामुळे विज्ञान, तर्कशक्ती, कल्पकता आणि प्रयोगशीलता यांचा संगम साधला गेला. ही परंपरा केवळ तांत्रिक नव्हे, तर जीवनदृष्टी, नैतिक मूल्ये आणि सृजनशीलतेसाठी मार्गदर्शक ठरते. त्यामुळे वैमानिकशास्त्र व ऋषींचे योगदान भारतीय संस्कृती आणि ज्ञानपरंपरेचा अभिन्न भाग मानला जातो.

भारतीय ज्ञानपरंपरेचे समकालीन महत्त्व:-

भारतीय ज्ञानपरंपरेची उपयुक्तता व समकालीन महत्त्व आजच्या आधुनिक युगात अधिक प्रकर्षाने जाणवते. वेद, उपनिषदे, दर्शनशास्त्र, आयुर्वेद, योग, नीतिशास्त्र व साहित्य यांच्या माध्यमातून विकसित झालेली ही ज्ञानपरंपरा मानवाच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक व आध्यात्मिक विकासाचा समन्वय साधते. आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाने भौतिक प्रगती साधली असली तरी जीवनातील ताणतणाव, असंतुलन, नैतिक अधःपतन व पर्यावरणीय संकटे वाढत आहेत. अशा परिस्थितीत भारतीय ज्ञानपरंपरेतील संतुलित जीवनशैली ,सहअस्तित्व ,अहिंसा' व 'वसुधैव कुटुंबकम्' यांसारख्या संकल्पना समाजाला योग्य दिशा देतात. योग व आयुर्वेद आज जागतिक स्तरावर स्वीकारले जात असून आरोग्यसंवर्धनाच्या दृष्टीने त्यांची उपयुक्तता सिद्ध झाली आहे. तसेच भारतीय तत्त्वज्ञानातील विवेक, आत्मचिंतन व मूल्याधिष्ठित जीवन आधुनिक शिक्षण व संशोधनासाठी मार्गदर्शक ठरते. त्यामुळे भारतीय ज्ञानपरंपरा ही केवळ ऐतिहासिक वारसा नसून ती समकालीन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त व प्रेरणादायी आहे. आजच्या विज्ञानप्रधान युगात भारतीय ज्ञानप्रणाली टिकाऊ विकास, मानसिक आरोग्य, पर्यावरणसंवर्धन व मूल्यशिक्षणासाठी उपयुक्त ठरते. योग व आयुर्वेद यांची जागतिक स्तरावर दखल घेतली जात आहे.

निष्कर्ष:-

भारतीय संस्कृतीतील ज्ञानपरंपरा ही केवळ प्राचीन वारसा नसून ती मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी आजही तितकीच उपयुक्त आहे. वेद, उपनिषदे, दर्शनशास्त्र, आयुर्वेद, योग, साहित्य व लोकपरंपरा यांच्या माध्यमातून भारतीय ज्ञानपरंपरेने सत्य, नैतिकता, सहअस्तित्व आणि जीवनमूल्यांची व्यापक दृष्टी दिली आहे. या परंपरेत वैज्ञानिक विचार, आध्यात्मिक चिंतन आणि सामाजिक समतोल यांचा समन्वय आढळतो. आधुनिक काळातील तंत्रज्ञानप्रधान जीवनशैलीतही भारतीय ज्ञानपरंपरेतील मूल्ये मानवतेला दिशा देऊ शकतात. त्यामुळे भारतीय संस्कृतीतील ज्ञानपरंपरेचे जतन, अभ्यास व आधुनिक संदर्भात पुनरुज्जीवन करणे हे काळाची गरज असून त्यातूनच शाश्वत आणि समृद्ध समाजनिर्मिती शक्य होईल.

संदर्भसूची:-

१)दिक्षित ना.सी.(२०१८)भारताचा इतिहास (१५२६ ते १९४७), पिंपळापुरे प्रकाशन अँड कंपनी, नागपूर
२) भगत डॉ. राहुल व आगलावे डॉ. प्रदीप (२०२२) समाजशास्त्री संकल्पना आणि सामाजिक प्रक्रिया , साईनाथ प्रकाशन, नागपूर
३)गायधनी प्रा.रं.ना.(२००६) प्राचीन भारताचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
४) गायधनी प्रा.रं.ना. व राजूरकर व.ग. (२००७) प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे
५) जवाहरलाल पंडित नेहरू (१९४६) भारताचा शोध
६) श्रीराम डॉ. राजू घनश्याम (२०२४) सामाजिक संशोधन पद्धती व तंत्र, संजय ठाकरे सर साहित्य केंद्र, नागपूर